परिपत्रक (तातडीचे/महत्वाचे)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
कामगार कल्याण विभाग
क्र.- काक/७/कावि/ ११५४ /२०२५
दिनांक - ०९/०४/२०२५

प्रति,
मा.संबंधित विभाग प्रमुख
सर्व विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – १८.

विषय: पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील सर्व विभागातील कंत्राटदारांकडील कंत्राटी कामगार व सफाई कामगारांच्या वेतनाबाबत...

महोदय,

उपरोक्त विषयान्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील सेवा देणाऱ्या सर्व कंत्राटदारांनी कामगारांचे वेतन, अदायगी कायदा १९३६ मधील कलम ५(ब) नुसार १० तारखेपर्यंत वेतन अदा करणे आवश्यक असून, कंत्राटदाराने उक्त कायद्यातील कलम (ब) चे उल्लंघन केल्यास कंत्राटदारांना र.रू.१०००/- पर्यंत दंड करता येतो तसेच सदरचा गुन्हा वारंवार घडत असेल अशा कंत्राटदारास र.रू.३०००/- दंड करण्यात येतो. व त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची तरतुद आहे.

तथापि दि.१४/०४/२०२५ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती असल्याने सर्व विभाग प्रमुखांनी त्यांचेकडील कंत्राटी कामगारांचे वेतन १० तारखेपुर्वी करणे बंधनकारक असून वेतन करणेस विलंब झाल्यास सदर कंत्राटदारावर किमान वेतन कायदा १९३६ नुसार उपरोक्त नमुद केलेली कारवाई करणेत येईल. याची सर्व कंत्राटदारांनी स्पष्ट नोंद घ्यावी.

०९/०४/२५
(संदीप खोत)
उप आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८